राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

*४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.*

*दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५६२३४*
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-३(अ)/संप/२०२२/२०९५ दिनांक : 23 JUN 2022

## परिपत्रक

**संदर्भ :- सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : संघटना १५२२/प्र.क्र. २२/ १६-अ, दिनांक ०१/०६/२०२२.**

उपरोक्त संदर्भांकित परिपत्रकाच्या अनुषंगाने, या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय / निमशासकीय कर्मचारी यांच्या राज्य सरकारी कर्मचारी संघटनांनी विविध मागण्यासंदर्भात दिनांक २३/०२/२०२२ व दिनांक २४/०२/२०२२ दोन दिवस संप जाहिर केलेला होता. तथापि दिनांक २३/०२/२०२२ रोजी कर्मचारी संघटनांनी दुपारी १२.०० संप मागे घेतल्याचे जाहिर केले. त्याअनुषंगाने दिनांक २३/०२/२०२२ रोजी जे कर्मचारी कार्यालयात अनुपस्थित राहिले अथवा विलंबाने उपस्थित होते त्यांची अनुपस्थिती " नैमित्तिक रजा" म्हणून नियमित करण्यात यावी. सोबत परिपत्रक जोडले आहे.

सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्यांची स्वाक्षरी घ्यावी. व तसा अहवाल कार्यालयास सादर करावा.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**प्रत - सर्व संस्था प्रमुख यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी**

१) संचालक / प्राचार्य / उपसचिव,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय संस्था /कार्यालय
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
07 JUN 2022
आवक क्र. ......

**राज्य सरकारी कर्मचारी संघटनांनी दि.२३ व २४ फेब्रुवारी, २०२२ या कालावधीत पुकारलेल्या संप कालावधीतील दि.२३ फेब्रुवारी २०२२ रोजी अनुपस्थित असलेल्या शासकीय कर्मचारी यांचा अनुपस्थितीचा कालावधी नियमित करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संघटना १५२२/प्र.क्र.२२/१६-अ**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०१ जून, २०२२.

**<u>वाचा</u> :-**सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: संघटना १५२२/प्र.क्र. २२/१६-अ,दि.२२.०२.२०२२.

**<u>प्रस्तावना :-</u>**

राज्य सरकारी कर्मचारी संघटनांनी विविध मागण्यासंदर्भात दि.२३ व २४ फेब्रुवारी, २०२२ या दोन दिवसाच्या संपाची राज्य शासनास नोटीस दिली होती. सदर संपात कर्मचाऱ्यांनी सहभागी होवू नये असे आवाहन संदर्भाधिन परिपत्रकान्वये करण्यात आले होते. तसेच संप मागे घेण्याबाबत राज्य सरकारी कर्मचारी संघटनांना राज्य शासनाने आवाहन केले होते. शासनाच्या आवाहनास प्रतिसाद देवून, दि.२३ फेब्रुवारी, २०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता कर्मचारी संघटनांनी संप मागे घेतला. त्यामुळे दि.२३ फेब्रुवारी, २०२२ रोजी काही शासकीय कार्यालयांमध्ये कर्मचारी अनुपस्थित अथवा विलंबाने उपस्थित झाले. ही बाब विचारात घेता, दि.२३ फेब्रुवारी,२०२२ रोजी संपात सहभागी होण्यासाठी जे शासकीय कर्मचारी कार्यालयात अनुपस्थित होते त्या कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती नियमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन परिपत्रक :-</u>**

राज्य सरकारी कर्मचारी संघटनानी विविध मागण्यांसंदर्भात दि.२३ व २४ फेब्रुवारी २०२२ या दोन दिवसाच्या कालावधीत संप पुकारला होता. तथापि, दि.२३ फेब्रुवारी,२०२२ रोजी कर्मचारी संघटनांनी दुपारी १२.०० नंतर संप मागे घेतल्याचे जाहिर केले. त्यामुळे दि.२३ फेब्रुवारी २०२२ रोजी जे कर्मचारी कार्यालयात अनुपस्थित राहिले अथवा विलंबाने उपस्थित राहिले त्यांची अनुपस्थिती " नैमित्तिक रजा" म्हणून नियमित करण्यात यावी. सदर बाब ही पूर्वोदाहरण म्हणून समजण्यात येवू नये.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२२०६०११२३२१९९८०७ हा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

MADHUKAR
SARJERAO GHOGARE

Digitally signed by MADHUKAR SARJERAO GHOGARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=539635e59a0a994a979279d79261fa9f3f9070d1a37dfe29dbc4be5d1c827801, pseudonym=AC3147DBADAD7F4C4CB2DE52BE143189B6FA5D3D, serialNumber=344B951816C517FCEA0454E21D7FDE25CC87830C180514DAFD445EC2BC6B50BF, cn=MADHUKAR SARJERAO GHOGARE
Date: 2022.06.01 12:35:37 +05'30'

**(म.स.घोगरे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई ३५.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई-३२.

३. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२.
४. मा.सभापती/उपासभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष,महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२.
७. सर्व सन्माननीय विधानसभा/विधान परिषद व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
८. मा.मुख्य सचिव, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२.
९. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
११. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१२. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
१३. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
१४. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
१५. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई ३२
१६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई ३२
१७. प्रधान सचिव (महाराष्ट्र विधान परिषद), महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई ३२
१८. प्रधान सचिव (महाराष्ट्र विधान सभा ), महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ३२
१९. सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई ३२
२०. महासंचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई ३२
२१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२२. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
२३. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका, महाराष्ट्र राज्य
२४. राज्यातील सर्व महामंडळे,मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
२५. उपसचिव, (आस्थापना) सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय, मुंबई ३२
२६. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय
२७. विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
२८. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य
२९. निवड नस्ती (कार्यासन १६-अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२